सकाळ
कोल्हापूर, गुरुवार, ६ जून २०२४

# 'विवेकानंद'मध्ये रविवारी शैक्षणिक धोरणांवर व्याख्यान

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०६ वी जयंती रविवारी (ता. ९) सकाळी १०.३० वाजता विवेकानंद महाविद्यालयाच्या डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे होत आहे. यावेळी मुख्याध्यापक दत्तात्रय वारे यांचे 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका,' यावर व्याख्यान होणार आहे. संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी, संस्थेच्या १३ जिल्ह्यांतील ४०७ शाखांमधून गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. दुपारच्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्राचे आयोजन केले आहे. कार्यक्रमासाठी शिक्षणप्रेमी, अभ्यासक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.